# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१०४९
०२०—२५६२१०५०

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:— अंगुसिक/एआयएसएचई/480                दिनांक — 10 DEC 2020

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय — संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थांनी सन २०२०—२१ करीता अखिल भारतीय उच्च शिक्षण (A.I.S.H.E.) सर्वेक्षण कार्यक्रम या वेबपोर्टलवर नोंदणी करणेबाबत.**

संदर्भ — मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे पत्र क्र.उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२०—२१/८१०५, दि. ०२ डिसेंबर, २०२०.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरून सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांना कळविण्यात येते की, दरवर्षाप्रमाणे सन २०२०—२१ या शैक्षणिक वर्षाची माहिती ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) च्या www.aishe.gov.in या वेबपोर्टलवर भरावयाची आहे.

सन २०२०—२१ पूर्वी/मध्ये ज्या महाविद्यालये व परिसंस्थांनी ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर अद्यापही नोंदणी केलेली नाही, अशा महाविद्यालये व परिसंस्थांनी सदर वेबपोर्टलवर अद्यापपर्यंत नोंदणी का केली नाही, याचा खुलासा मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांच्याकडे त्वरित सादर करावा आणि त्याची प्रत विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्षाकडे सादर करून तातडीने सदर वेबपोर्टलवर नोंदणी करावी.

तसेच, सन २०२०—२१ मध्ये ज्या महाविद्यालयांना/परिसंस्थांना नव्याने मान्यता मिळालेली आहे, अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत संबंधित वेबपोर्टलवर, महाविद्यालयाचे/परिसंस्थांचे नांव समाविष्ट करण्यासाठी नोडल अधिका—याचे नांव, मोबाईल नंबर, महाविद्यालयाचे/परिसंस्थांचा नोंदणी क्रमांक, ई—मेल आयडी तसेच शासन निर्णय व संलग्निकरणाचे पत्र (Affiliation Letter) इ. माहिती उक्त पोर्टलवर अपलोड करून नोंदणी करावी.

तसेच पुढील मान्यतेकरीता (Registration Approval) संबंधित महाविद्यालये / परिसंस्थांच्या नोडल अधिका—यांनी मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे—१ यांच्या कार्यालयाकडे वरील कागदपत्रांसह उपस्थित राहून मान्यता घेणे गरजेचे आहे.

सदरील माहिती शासनास अत्यावश्यक असून सर्व संबंधित संलंग्नित महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशन (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर नोंदणी करून सहकार्य करावे. यासंदर्भात काही अडचणी आल्यास अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे दूरध्वनी क्रमांक ०२०—२५६२१०५० व ई—मेल iqac@unipune.ac.in वर संपर्क साधावा.

कळावे,

आपला,

(मुं. वि. रासवे)
उपकुलसचिव
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)

**प्रत माहितीसाठी:—**

१. मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.
२. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
३. सहायक कुलसचिव, मा. प्र—कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.